


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २४३, गुरुवार १३ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# कांदा, दूध दरवाढीवर आवाज उठविणार

## नीलेश लंके दिल्लीत दाखल । दिल्लीतही खा. नीलेश लंकेंभोवती माध्यमांचा गराडा !

नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी

**माझ्या मतदारसंघाची भौगोलिक परिस्थिती पाहिली तर बहुतांश भाग ग्रामीण बहुल आहे. निवडणूकीदरम्यान कांद्याची निर्यात बंदी आणि दूधाची दरवाढ हे प्रश्न माझ्या निदर्शनास आले. हे ज्वलंत प्रश्न असून त्याविरोधात आपण संसदेत आवाज उठविणार असल्याचे खा. नीलेश लंके यांनी नवी दिल्लीत माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.**

लोकसभा निवडणूकीत यश संपादन केल्यानंतर नीलेश लंके हे सहकाऱ्यांसमवेत प्रथमच बुधवारी नवी दिल्लीत पोहचले. लंके हे देशाच्या राजधानीमध्ये पोहचल्यानंतर माध्यमप्रतिनिधींनी त्यांना गाठून त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केला. लंके यांनी मात्र प्रत्येक प्रश्नाला मोठया खुबीने उत्तरे देत आपली राजकीय परीपक्वता सिध्द केली. लंके यांच्या समवेत राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, प्रमोद मोहिते, डॉ. बाळासाहेब कावरे, नितिन चिकणे, सुभाष शिंदे, रामा तराळ, गौरव भालेकर, सुनील कोकरे यांच्यासह असंख्य लंके समर्थक उपस्थित होते.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, कांदा, दूध दराबरोबरच पिण्याच्या, शेतीच्या पाण्याचे प्रश्न आहेत. औद्योगिकरणाचे प्रश्न आहेत. हे प्रश्न येणाऱ्या कालखंडामध्ये हे प्रश्नही मी सोडविण्याचा प्रयत्न करणार आहे.

लंके म्हणाले, माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यासाठी दिल्ली नविनच आहे. माझ्यासाठी लोकसभेची निवडणूक अविस्मरणीय झाली. मी एकदम सर्वसामान्य कुटूंबातला असून माझ्या राजकीय प्रवास अतिशय खडतर झालेला आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना ग्रामपंचायतीचा सदस्य, सरपंच ते खासदार या पदापर्यंत पोहचण्याचा बहुमान मला या मतदारसंघातील मायबाप जनतेने दिला असल्याचे लंके यांनी सांगितले.



■ नगर दक्षिण मतदारसंघाचे नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके हे प्रथमच दिल्लीत पोहचल्यानंतर माध्यम प्रतिनिधींनी त्यांना गराडा घातला.

### माझ्यासाठी भाग्याचा दिवस

नेते मंडळींनी माझ्यावर विश्वास टाकला. मतदारांनी तो विश्वास सार्थकी ठरविला. दिल्लीमध्ये आल्यानंतर एक वेगळं वातावरण पहायला मिळालं. कधी आपण स्वप्नात न पाहिलेली दिल्ली, आज आपल्याला प्रत्यक्षात संसदेत जाण्याचा बहुमान मिळणार आहे. माझ्यासाठी हा भाग्याचा दिवस आहे.

खासदार नीलेश लंके

### त्यांच्या शुभेच्छा ग्राहय धरून काम

विरोधी उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी तुम्हाला शुभेच्छा दिल्या का ? या प्रश्नाला उत्तर देताना खा. लंके म्हणाले, अद्याप तर मला शुभेच्छा तर आलेल्या नाहीत. शुभेच्छा आल्या नसल्या तरी त्या ग्राहय धरून पुढे काम करायचे असल्याचे लंके म्हणाले.

### मला संसदेत तर जाऊ द्या

केंद्राने बजेट सादर केले त्यात महाराष्ट्राला ८ हजार कोटी, उत्तर प्रदेश, बिहारला १५ ते २० हजार कोटी दिले आहेत. महाराष्ट्राच्या दृष्टीने हा दुजाभाव नाही का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, दुजाभाव निश्चित आहे, मात्र मी अद्याप संसदेमध्येच गेलेलो नाही, तिथे गेल्याशिवाय या प्रश्नावर मला बोलता येणार नाही.

### त्या प्रश्नावर बोलावे लागेल

गुजरातच्या कांद्याच्या निर्यातीस परवानगी मिळते. तिथल्या कांद्याला भाव मिळतो या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, याच प्रश्नावर आता आम्हाला बोलावे लागणार आहे, असे लंके म्हणाले.

### मी छोटा कार्यकर्ता

राज्यसभा निवडणूकीसाठी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असून अजित पवार यांच्याकडून सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांची नावे पुढे येत आहे. पवार यांच्याकडून पक्ष ते परीवार अशा पध्दतीने वाटचाल सुरू आहे का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, अजितदादा एका पक्षाचे नेते आहेत. ते त्यांचा निर्णय घेतील. माझ्यासारख्या छोटया कार्यकर्त्याने इतक्या मोठया राजकीय उंचीवरील विषयावर भाष्य न केलेले बरे.

### मी कोणालाही अंगावर घेत नाही

तुम्ही नेहमी अजित पवार यांच्या बाबतीत बोलताना सांभाळून बोलता, इतरांना मात्र अंगावर घेता असे का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, मी कोणालाही अंगावर घेत नाही. मी कामाला महत्व देणारा माणूस आहे. समोरच्याची रेष पुसण्यापेक्षा आपली रेष वाढवायची हा माझा प्रयत्न असतो त्यामुळे अशा भानगडीत मी पडत नाही. आपण गरीब माणसं आहोत.

### दिल्लीतही लंके यांचीच क्रेझ !

महाराष्ट्रातील मीडियासाठी नीलेश लंके यांचे नेहमीच आकर्षण राहिलेले आहे. नीलेश लंके हे दिल्लीत पोहचल्यानंतर तिथल्या माध्यमांमध्येही खा. नीलेश लंके यांची क्रेझ असल्याचे पहावयास मिळाले. मंगळवारी रात्री लंके हे दिल्लीत पोहचल्यानंतर बुधवारी सकाळीच विविध वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींनी महाराष्ट्र सदनमध्ये लंके यांना गाठले. दिल्लीतील माध्यमांनाही लंके यांचे आकर्षण असल्याचे यावेळी जाणवले.

### जशास तसे उत्तर देऊ शकतो !

निवडणूकीदरम्यान मराठी आणि इंग्रजीचा वाद सुरू झाला होता. त्यासाठी काही धडे लावण्याचा निर्णय घेतलाय का या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, धडे लावण्याची काही गरज नाही. कोणताही माणूस त्याच्या आईच्या उदरातून शिकून येत नाही. एकदा पाण्यात पडल्यावर पोहायला शिकतोच ना ? तशीच ही स्थिती आहे. मी दिल्लीत आलोय. जरा अंदाज घेतोय. संसद कोणत्या बाजूला आहे ? कुठून आत जायचं हेच माहीती नाही. मात्र आत गेल्यानंतर बरोबर शिकणार आहे मी. कुठल्या माणसाला कुठली भाषा अभिप्रेत आहे ? तशा भाषेतच मला बोलावे लागणार आहे. मला जो प्रश्न मांडायचा आहे त्याला माझी भाषाच समजली नसेल तर मला त्याच भाषेत बोलावे लागेल नाही. त्यासाठी ती भाषा मला शिकावी लागेल. जशास तसे उत्तर मी देऊ शकतो.

### मला संघर्ष नवा नाही

नीलेश लंकेचा जन्म संघर्षातून झालेला आहे. माझ्यासारखा सर्वसामान्य कुटूंबातला, एका शेतकऱ्याचा, प्राथमिक शिक्षकाचा मुलगा या पदापर्यंत पोहचतो हेच विशेष आहे. मी २०१० ला सरपंच, २०१२ ला पंचायत समिती सदस्य, २०१४ ला उपसभापती, २०१७ ला जिल्हा परिषद सदस्य, २०१९ ला आमदार आणि आता २०२४ ला खासदार झालो आहे. हा सर्व संघर्ष मी उकळून पिलो आहे. आमच्यासाठी संघर्ष नविन नाही. विरोधक वगैरे माझ्यासाठी नविन नाही. विरोधाला विरोध करणारा मी माणूस नाही. कामाला महत्व देणारा मी माणूस आहे. आपला जो रस्ता आहे त्या रस्त्याने जायचे. राजमार्गाने पुढे जाउन यश हासील करायचे आणि लोकांना न्याय द्यायचा हेच माझे ध्येय आहे.

खासदार नीलेश लंके

# खा. लंकेंच्या माध्यमातून राष्ट्रवादीने पकडला मराठीचा मुद्दा !

## पवारांनी विखेंच्या मर्मावर ठेवले बोट



**लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचा रौप्य महोत्सवी वर्धापन दिन साजरा झाला. तो तसा अनोखा आणि पक्षाला वेगळया वळणार घेऊन जाणारा ठरला. राष्ट्रवादी पक्षाची जी मोडतोड झाली, त्याला कोण जबाबदार ? याची कारण मिमांसा सर्वश्रुत आहे. त्यावर आता भाष्य करणं हशील नाही.**

शरद पवार यांनी मुठभर शिलेदारांना बरोबर घेऊन राजकीय गड सर केला.




कोर्ट-कचेऱ्या आणि अन्य कायदेशीर बाबींमध्ये न्याय मिळाला नसला तरी सुध्दा जनतेच्या न्यायालयात खरी राष्ट्रवादी शरद पवार यांचीच आहे, यावर मतपेटीद्वारे शिक्कामोर्तब झाले. मग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कितीही टाहो फोडून नकली उपाधी चिटकविण्याचा प्रयत्न केला तरी तो जनतेने मतपेटीद्वारे धुडकाऊन लावला. राष्ट्रवादीचे अतापर्यंत मुंबई, नागपुर, नाशिक, औरंगाबाद आदी ठिकाणी जे वर्धापनदिन झाले त्यापेक्षा अहमदनगर येथील काल-परवा वर्धापन दिनाचा जो कार्यक्रम झाला, तो आगळा- वेगळा आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाला उत्तुंग उंचीवर नेऊन ठेवणारा ठरला. या कार्यक्रमाचे वैशिष्ठ होते की राष्ट्रवादीला या निमित्ताने मराठीचा मुद्दा मिळाला. आणि तोही नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांच्या मध्यमातून की आतापर्यंत मनसे आणि शिवसेना आपलाच ब्रँड समजत होती. परंतू दिल्लीपर्यत नेऊन तो संसदेत कधीच गाजवता आला नाही. आता तो मराठीचा डंका खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून शरद पवार करणार हेच त्यांच्या वर्धापन दिनाच्या भाषणातून स्पष्टपणे सुचित होते.

निवडणूक प्रचारात इथं काही लोक म्हणत होते की संसदेत इंग्रजी बोलावे लागते, पण तिथे मराठीत बोलता येते. हिंदी, इंग्रजीसह आपल्या मातृभाषेत बोलता येते. पण तुम्ही मराठी भाषेत काय बोलणार ? याचा भरोसा नाही हे पवार साहेबांनी आवर्जुन निदर्शनास आणून दिले. त्यांनी मा. खा. सुजय विखे यांचा नामोल्लेख टाळला असला तरी त्यांच्या वर्मावर नेमकेपणाने बोट ठेऊन इंग्रजीतच बोलले पाहिजे या विखेंच्या बडेजाव दाखविणाऱ्या धारणेलाच पवारांनी पुरता छेद दिला.

पवार साहेबांनी व्यूहरचना करून खा. लंके यांच्या माध्यमातून संसदेत मराठीचा डंका वाजविला तर भाजपा-शिवसेनेसह मनसे या राजकीय पक्षांचा अजेंडाच हिरावला जाणार त्यात लंके यांनी प्रसंगी संसद ठप्प करू असा गर्भीत इशारा देऊन आगामी आक्रमक राजकारणाची गर्जनाच केली. शरद पवार यांचा प्रदिर्घ अनुभव आणि त्यांच्या शिलेदारांचे आक्रमक राजकारण यांचा संगम झाला तर राष्ट्रवादीला वेगळे प्रमाण मिळेल. त्यांना महाराष्ट्रातील इतर राजकीय पक्ष रोखू शकणार नाहीत. हाच संदेश या अहमदनगरच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने मिळालेला आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला या वर्धापनदिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या अस्मितेशी निगडीत मराठीचा मुद्दा मिळाला असून खा. नीलेश लंके हे दिल्लीत मराठीचा आवाज ठरणार असाच रागरंग दिसतो.

### दुग्धशर्करा योग

राष्ट्रवादीने यापूर्वी मराठीच्या मुद्याला ऐवढा राजकीय आग्रक्रम दिला नव्हता तो आता ऐरणीवर घेतला, त्यासाठी पारनेरच्या सुपूत्राची ढाल केली जाईल. पारनेरचे सेनापती बापट यांनी मराठी आणि देशाप्रती जे कौशल्य पणाला लावले त्याची पुनरावृत्ती करण्याची संधी खा. लंके यांना मिळणार असल्याने हा दुग्धशर्करा योग राजकीय निरीक्षकांना दुर्लक्षून चालणार नाही. या निमित्ताने नगर शैलीच्या मराठी भाषेचा दिल्लीत कस लागणार आहे, त्याची राजकीय परीणामकारता काय होईल हे यशावकाश स्पष्ट होईलच.

### पवारांचे धोरण शिरसावंद्य मानावे लागेल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भटकती आत्मा अशी निवडणूक प्रचारादरम्यान पुण्यात शरद पवार यांच्यावर जी टीका टिपन्नी केली त्याला निवडणूक निकालानंतर वर्धापन दिनाचे औचित्य साधून सडेतोड प्रत्युत्तर दिले, तेही हिंदू संस्कृतीमधील आधार घेऊन पवार साहेब म्हणाले, आत्मा कायम असतो. तो तुम्हाला सोडणार नाही. म्हणून त्यांनी सुचित केले की मी असो अगर नसो माझ्या पक्षाचा तुम्हाला मोदीला विरोध राहिल. तो तुम्हाला सोडणार नाही. हे राजकीय धोरण पवार साहेबांनी सुचित केले. ते त्यांच्या पक्षाला आणि कार्यकर्त्यांना शिरसावंद्यच मानावे लागेल.

### राष्ट्रवादीची फलश्रुती

पवार साहेब आणि भाजपाची सलगी याबाबत संशय घेणे आतातरी राजकीय निरीक्षकांना थांबवावे लागेल हीच राष्ट्रवादीच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनाची फलश्रुती मानावी लागेल.

# अजितदादांच्या भेटीला शिवाजी कर्डिले!

## श्रीगोंद्यातून विधानसभेसाठी चाचपणी



नगर :प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला फारसे यश आले नसले तरी विधानसभेच्या दृष्टीने राजकीय सोय म्हणून अनेक नेते पवार यांच्या पक्षाकडे पहात असल्याचे दिसते. नगर जिल्ह्यातील भाजपचे नेते, माजी मंत्री शिवाजी कर्डिले यांनीही अजितदादांची मुंबईत भेट घेतली आहे. या भेटीचे छायाचित्र कर्डिले यांचे पुत्र अक्षय यांनी सोशल मीडियात शेअर केले आहे. त्यावरून आता राजकीय चर्चा सुरू झाल्या असून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी नेहमीचा मतदारसंघ राहुरी यासोबतच श्रीगोंदयातूनही कर्डिले चाचपणी करीत आहेत. तेथील जागा अजितदादांच्या वाट्याला गेल्या तर आपला दावा कायम रहावा यासाठी कर्डीले यांची भेट असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.**

जिल्हा बँकेचे अध्यक्ष आणि नगर जिल्ह्यातील मुरब्बी राजकारण्यांपैकी एक असलेले शिवाय सगे-सोयऱ्यांच्या राजकारणातील प्रमुख सूत्र असलेले कर्डीले यांनी अजितदादांची भेट घेतल्याने जिल्ह्यात राजकीय चर्चा रंगली आहे. मागील विधानसभा निवडणूक कर्डीले यांनी भाजपकडून राहुरीमधून लढविली होती. तेथे राष्ट्रवादीचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी त्यांचा पराभव केला होता. यावेळी कर्डीले पुन्हा इच्छूक आहेत. याशिवाय बदलत्या राजकीय समीकरणाचा फायदा घेत कर्डीले श्रीगोंद्यातूनही चाचपणी करीत आहेत. तेथे भाजपचे आमदार बबनराव पाचपुते आहेत.

प्रकृतीच्या कारणामुळे त्यांना पुन्हा उमेदवारी मिळणार का? याची शाश्वती वाटत नसल्याने कर्डीले उर्वरीत पान ३ वर






निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

## मासिक पाळी नीट राहावी म्हणून

# काय खाऊ नये?

**मासिक पाळी हा कोणत्याही महिलेसाठी जिव्हाळ्याचा विषय. प्रत्येक महिलेला निदान ३०-३५ वर्षे दर महिन्याला पाळी येते आणि त्यासोबत येणारे त्रासही सहन करावे लागतात. पाळी फक्त गर्भधारणेशी संबंधित नसून मासिक पाळीचं चक्र नियमित राहिलं तर महिलांचं इतर आरोग्यही चांगलं राहतं. मासिक पाळी सुरळीत राहाण्याचा आणि तुम्ही काय आहार घेताय याचाही फार जवळचा संबंध असतो.**

समतोल आहारामुळे पाळीचं चक्र नियमित राहातं. पाळीमध्ये अगोदरपासूनच गुंतागुंत असेल तर आहारात योग्य बदल केल्यानं फायदा होऊ शकतो. जंक फूडमुळे मासिक पाळी नियंत्रित करणाऱ्या हार्मोन्सवर परिणाम होतो आणि त्यामुळे पाळी उशीरा येणं किंवा वेळेपेक्षा जास्त लांबणं असे प्रकार घडू शकतात. अन्नात हिमोग्लोबिनची कमतरता असेल पाळीच्या वेळी कमी रक्तस्त्राव होऊन त्रास होऊ शकतो. पाळी संदर्भात आहाराचं खूपच महत्त्व आहे, पण अनेक महिलांना हे माहितीच नसतं की आपण जे खातोय त्याने आपल्या पाळीवर परिणाम होतोय. सतत शिळं अन्न खाणं किंवा चौरस आहार न घेणं यामुळे तुमची पाळी अनियमित होते, उशीरा येते. मासिक पाळी नियमित असावी यासाठी आहारातलं फॅट्सचं प्रमाण कमी करायला हवं. तुमच्या जेवणात खूप तेलकट पदार्थांचा समावेश असेल तर त्याने हार्मोनल बदल होऊन पाळीवर परिणाम होतो. जंक फुड खाल्ल्याने पाळी अनियमित होऊ शकते. गोड पदार्थांचं अतिसेवन करणंही टाळावं. अनेकदा असं लक्षात आलं आहे की, मासिक पाळी सुरू असताना जर तुम्ही गोड जेवण केलंत तर तुम्हाला होणारा त्रास वाढतो. तुमच्या आहारातल्या कॅलरीचं प्रमाण खूप वाढलं तर शरीरात हार्मोन्सचं संतुलन बिघडतं. कधी कधी शरीरात पुरुषी हार्मोन्सचं प्रमाणही वाढतं. त्यामुळे स्कीन खराब होणं, मासिक पाळी अनियमित होणं असे साईड इफेक्ट होतात. खूप मसालेदार, खूप गरम जेवण करू नये. यामुळे मासिक पाळीच्या काळात अतिरक्तस्त्राव होऊ शकतो किंवा पाळीचा कालावधी लांबू शकतो. पाळी दरम्यान होणारा त्रास कमी करायचा असेल, पाळी नियमित यावी असं वाटत असेल तर आहाराची काही महत्त्वाची सूत्रं पाळली पाहिजेत. दिवसात तीन आहार घेतलेच पाहिजेत. सकाळचा नाश्ता, दुपारचं जेवण आणि रात्रीचं जेवण नियमितपणे, ठरलेल्या वेळेला करा. पण दोन जेवणांच्यामध्ये शक्यतो काहीही खाणं टाळा. रात्रीचं जेवणं शक्यतो झोपण्याच्या तीन तास आधी घ्या. रात्री जेवल्याजेवल्या लगेच झोपू नका. रात्रीचं जेवण आणि सकाळचा नाश्ता यात कमीत कमी १२ तासांचं अंतर ठेवा. या गोष्टी पाळल्या तर आपल्या पचनसंस्थेचं कार्य सुधारतं आणि आपण जे अन्न घेतोय त्याचं चरबीत रुपांतर होत नाही.

### काय खावं?

अनेक स्त्रियांमध्ये हिमोग्लोबिनचं प्रमाण कमी असतं. त्यामुळे त्यांना पाळीच्या काळात रक्तस्त्राव कमी होतो किंवा पाळीच अनेकदा येत नाही. अशा परिस्थितीत कोथिंबीर, पालक, बीट यांचा आहारात जास्तीत जास्त समावेश करावा. त्याच बरोबर जेवताना डाळी, शेंगदाणे, सोयबीन, वाटाणे अशा प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असायला हवा. पनीर, मासे, चिकन असा प्रोटीनचा साठा असणारे पदार्थही आहारात अधून मधून असायला हवेत. रोजच्या जेवणात कोशिंबीरी असाव्यात.



### पाळी येण्याच्या आधी आहार कसा असावा?

पाळी आधी, पाळी दरम्यान आणि पाळीनंतर आहारात थोडे बदल करावेत. यूकेच्या नॅशनल हेल्थ सिस्टिमने याबद्दल काही मार्गदर्शक तत्वंही जारी केली आहेत. पाळीच्या आधी तुमच्या शरीरात काही बदल होत असतात, प्रीमेन्स्ट्रुअल सिंड्रोममधून शरीर जात असतं. याकाळात शारीरिक तसंच मानसिक त्रास होण्याची शक्यता असते. अनेक महिलांना मुड स्विंग्स, थकवा, चिडचिड अशी लक्षणं जाणवतात. याकाळात भूकही जास्त लागते. विशेषतः गोड किंवा चटपटीत, मीठाचं प्रमाण जास्त असलेले पदार्थ खाण्याची इच्छा होते. याच कारणं म्हणजे पाळी यायच्या काही दिवस आधी तुमच्या रेस्टिंग मेटॅबोलिझम रेटमध्ये तात्पुरती वाढ झालेली असते. त्यामुळे काही रिसर्च असं सुचवतात की या काळात दिवसाला १०० ते ३०० कॅलरी जास्त घेतल्या तरी चालू शकतं. भुकेच्या बाबतीत तुमच्या शरीराचं ऐकणं ही एक चांगली गोष्ट आहे. त्यामुळे आपल्या शरीराला उर्जा मिळते आणि आपलं शरीर नीट काम करू शकतं. या काळात फायबरयुक्त कार्बोहायड्रेड्स (जसं की बाजरी, गव्हाचा जाडसर आटा, ज्वारी, नागली अशी धान्यं) किंवा प्रोटीनयुक्त आहार घ्यायला हवा. गोड पदार्थ किंवा जंक फुड खाण्याची या काळात इच्छा होते पण त्याचा शरीराच्या गरजेशी संबंध नसतो तर ते आपल्या मुडवर अवलंबून असतं. या काळात आपल्याला असं अन्न खाण्याची इच्छा होते ज्याने आपल्याला आनंद होईल. पण त्यामुळे उलट थकवा, वेदना, झोप न येणं अशी लक्षणं जाणवतात. काही संशोधनांमधून असंही लक्षात आलंय की फळं खाल्ल्याने महिलांना पाळीआधी आणि पाळीदरम्यान होणारा त्रास कमी होऊ शकतो. चॉकलेटपैकी फक्त डार्क चॉकलेट (ज्यात ७० टक्के कोको असतो), ज्यात साखर कमी असते, खाता येऊ शकतं. इतर चॉकलेट्सने त्रास होण्याची शक्यता असते. या काळात कॉफीचं प्रमाणही कमी केलं पाहिजे. पाळीत डार्क चॉकलेट खाल्लं तरच फायदा होऊ शकतो, इतर प्रकारच्या चॉकलेट्सने नुकसानच होतं. मासिक पाळीच्या काळात पाणीही जास्त प्यायला हवं. या काळात जास्त पाणी प्यायलत तर अतिरक्तस्त्राव होत नाही. तसंच पाळीच्या काळात ज्या कळा येतात त्याही कमी होऊ शकतात. या काळात कोणत्याही प्रकारचं अल्कोहोल घेता कामा नये.

# ४ दिवसांत आंघोळ करताना कोणती काळजी घ्यावी?

**मासिक पाळीचे ते चार दिवस हे प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अतिशय नाजूक दिवस असतात. या चार दिवसांत स्त्रीच्या शरीरात अतिशय वेगवेगळे बदल घडून येतात, याचबरोबर अनेक हार्मोनल चेंजेस होताना दिसतात. मासिक पाळीच्या दरम्यान त्या स्त्रीला शारीरिक आणि मानसिक विश्रांतीची खरी गरज असते. बहुतेक स्त्रियांना मासिक पाळीच्या काळात पोटदुखी, डोकेदुखी, मळमळ होणे, मूड स्विंग, पायात पेटके येणे यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. या दिवसांत स्त्रियांनी स्वतःची विशेष काळजी घेणं गरजेचं असत. मासिक पाळीच्या काळात थोडासा निष्काळजीपणा किंवा आरोग्याची देखभाल न करणे यांसारख्या गोष्टी आपल्याला भविष्यात त्रास देऊ शकतात. या दिवसांत पर्सनल हायजिनसोबतच महिलांनी आपल्या तब्येतीची पुरेपूर काळजी घेतलीच पाहिजे.**

मासिक पाळी दरम्यान पर्सनल हायजिन व शरीराची स्वच्छता ठेवण्यासाठी दिवसांतून किमान दोनवेळा आंघोळ करणे हा उत्तम पर्याय आहे. या काळात आंघोळ केल्याने शारीरिक स्वच्छतेसोबतच आपल्याला फ्रेश राहण्यास मदत मिळते. मासिक पाळीदरम्यान पुरेशी स्वच्छता न ठेवल्यामुळे महिलांना युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनची (यूटीआय) समस्या होऊ शकते. म्हणूनच मासिक पाळीदरम्यान काही खास गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठीच मासिक पाळी दरम्यान आंघोळ करताना नेमक्या कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी घेतली पाहिजे, ते पाहूयात...



### या गोष्टींची काळजी घ्यावी...

- मासिक पाळी दरम्यान आपण जे पॅड किंवा कप वापरत असाल ते काढून टाकण्याची खात्री करा : मासिक पाळी दरम्यान आंघोळ करताना आपण जर कप किंवा पॅड लावले असेल तर ते आंघोळीपूर्वी काढून टाकावे. काहीजणी आंघोळ करताना रक्तस्त्राव थांबावा म्हणून पॅड किंवा कप तसाच ठेवून मग आंघोळ करतात, परंतु हे चुकीचे आहे. आंघोळ करताना मासिक पाळीचा रक्तस्त्राव होत असेल तर तो नैसर्गिकरित्या होऊ द्यावा. आंघोळ करताना होणारा रक्तस्त्राव थांबवू नका. याचबरोबर प्रायव्हेट पार्टजवळ असणाऱ्या प्यूबिक हेअर्सची स्वच्छता राखा. आंघोळी दरम्यान जुने वापरलेले पॅड, टॅम्पॉन काढून टाकताय याची खात्री करून घ्यावी.
- योनी मार्गाची स्वच्छता करणे गरजेची : मासिक पाळीत आंघोळ करत असताना योनी मार्गाची स्वच्छता करणे अतिशय महत्वाचे असते. योनी मार्गाची स्वच्छता करण्यासाठी गरम किंवा थंड पाण्याचा वापर न करता साध्या नॉर्मल पाण्याचा वापर करावा. योनी मार्ग स्वच्छ करण्यासाठी साबण किंवा इतर केमिकल्सयुक्त प्रॉडक्ट्सचा वापर करणे टाळावे. कारण केमिकल्सयुक्त व सुगंधित प्रॉडक्ट्सचा वापर केल्याने इंन्फेक्शन होण्याची शक्यता आहे.
- योनी मार्ग आतून स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू नका : साबण किंवा पाण्याचा वापर करून योनी मार्ग आतून स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू नका. योनी मार्ग स्वतःची स्वच्छता स्वतः करत असते. त्यामुळे आपल्याला त्याची वेगळी स्वच्छता करण्याची गरज भासत नाही. जर आपण योनी मार्ग आतून स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला इंन्फेक्शन होऊ शकते. यामुळे योनी मार्गात जळजळ होणे, पुरळ येणे, खाज उठणे यांसारख्या समस्या होऊ शकतात. याचबरोबर योनी मार्ग आतून स्वच्छ केल्यास आतील त्वचेची पीएच पातळी ही कमी जास्त होऊन योनी मार्गासंबंधित अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे योनी मार्ग नेहमी बाहेरुनच स्वच्छ करावे तसेच कायम पुसून कोरडे ठेवावे.



- मासिक पाळीच्या काळात किमान दोन वेळा तरी आंघोळ कराच : मासिक पाळीच्या काळात किमान दोन वेळा तरी आंघोळ करून शारीरिक स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. आंघोळ करताना अतिशय गरम किंवा थंड पाण्याचा वापर करू नये. थंड पाण्याने अजिबात आंघोळ करू नये. यामुळे आपल्या शरीरातील रक्ताच्या चक्रावर त्याचा परिणाम होतो. यासाठीच पाळी दरम्यान आंघोळ करताना साध्या नॉर्मल पाण्याचा वापर करावा.
- बाथरूम स्वच्छ आहे ना? : मासिक पाळी दरम्यान आंघोळीला जाताना बाथरूम स्वच्छ आहे ना याची खात्री करून घ्या. बाथरूम स्वच्छ असणे हे आपल्या शारीरिक हायजिनच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते. यामुळे मासिक पाळीदरम्यान आंघोळीला जाण्यापूर्वी आणि जाऊन आल्यानंतर बाथरुम स्वच्छ ठेवा.

### 'मासिक पाळी'च्या अज्ञानाचा परिणाम

- **६० ते ७० टक्के मुली या दिवसांमध्ये शाळेत जात नाहीत.**
- **२३ टक्के मुली पहिल्या पाळी नंतर शाळाच कायमची सोडून देतात.**
- **४३ टक्के मुली मासिक पाळीचे स्वच्छता व्यवस्थापन योग्य प्रकारे करत नाही.**
- **५४ टक्के मुलींना मासिक पाळी येण्याआधी तिच्या योग्य व्यवस्थापनेबद्दल काहीही माहिती नसते.**
- **७७ टक्के मुलींना गर्भाशय हे पाळी दरम्यान येणाऱ्या रक्ताचे स्त्रोत असते व ५५ टक्के मुलींना मासिक पाळी ही नैसर्गिक बाब असल्याचे माहिती नसते.**
- **१० टक्के मुली याला भयानक रोग मानतात. त्यामुळे बरेच गैरसमज वाढतात.**



# टॅम्पून्स, मेनस्ट्रअल कप म्हणजे काय?

**वयाच्या साधारण बाराव्या-तेराव्या वर्षांपासून पन्नाशीपर्यंत स्त्री प्रजननक्षम असते, याचाच अर्थ या काळात ती प्रत्येक महिन्यात मासिक पाळीच्या चक्रातून जात असते. हल्ली ही प्रक्रिया अगदी दहाव्या वर्षांपासूनसुद्धा सुरू होत असल्याचे दिसू येते. महिन्याच्या या चार ते पाच दिवसांत होणाऱ्या रक्तस्त्रावाच्या काळात स्वच्छतेची योग्य काळजी न घेतल्यास जंतुसंसर्ग होणे, चट्टे येणे आदी आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता असते. रक्तस्त्राव शोषण्यासाठी सॅनिटरी नॅपकिन, टॅम्पून हे एकदा वापरण्यासारखे, तर कापड/कापडी पॅड आणि कप हे पुनर्वापर करता येण्यासारखे पर्याय आहेत. अविवाहित मुली सहसा नॅपकिनचा (पॅड) पर्याय निवडतात. विवाहित महिलांनी टॅम्पून, कप आदी पर्याय वापरावेत, असे सुचविले जाते...**

### कापड/कापडाची घडी

आर्थिकदृष्ट्या न परवडणे, उपलब्धता नसणे किंवा पॅड्स विकत घ्यायला संकोच वाटणे आदी कारणांमुळे काही ठिकाणी अजूनही मुली आणि स्त्रिया पाळीच्या दिवसांत जुने कपडे वापरतात. हे कपडे धुऊन परत वापरले जातात. धुतल्यानंतर बऱ्याचदा हे कापड उन्हात न वाळवणे, योग्य न धुणे तसेच पाळीच्या दिवसानंतर अडगळीत ठेवणे यामुळे अशा कपड्यांच्या वापराने योनीचा जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते. हे कपडे धुवावे लागत असल्याने याचा वापर करणे शक्यतो टाळले जाते. परंतु दर महिन्याला बाजारातील पॅड्स विकत घेऊन वापरणे शक्य नसल्यास कापडी घडीचाच पर्याय निवडला जातो.

### कापडी पॅड

कापडी घडीला पर्याय म्हणून आता पर्यावरणपूरक कापडी पॅड ही बाजारात उपलब्ध आहेत. अंतर्वस्त्राच्या आतून याचा वापर केला जात असून धुवून पुनर्वापर करता येतो. बाजारातील सॅनिटरी पॅडच्या तुलनेत मऊ आणि नैसर्गिक असल्याने याच्या वापराने त्वचेवर शक्यतो चट्टे येत नाही किंवा मांड्यांमध्ये घर्षण होऊन चालताना त्रास होत नाही. पुनर्वापर केला जात असल्याने सॅनिटरी नॅपकिनप्रमाणे प्लास्टिक कचरा निर्माण होत नाही, तसेच आर्थिकदृष्ट्यादेखील परवडते. मात्र धुवून वाळवताना स्वच्छतेची काळजी न घेतल्यास महिलांना अंतर्भागात संसर्ग होण्याची भीती असते.

### सॅनिटरी पॅड्स/नॅपकिन

महिलांमध्ये सर्वाधिक वापरला जाणाऱ्या हा प्रकार आहे. हे पॅड एकदाच वापरण्यासारखे असून कापूस, प्लास्टिक आणि शोषक जेल (ॲबझॉबन्ट जेल) यापासून बनवले जातात. यात रेग्युलर, लार्ज, ते अल्ट्रा थिन असे विविध प्रकार असतात. संसर्ग किंवा चट्टे येऊ नयेत यासाठी दर चार ते सहा तासांनी पॅड बदलणे अपेक्षित असते. रक्तस्त्राव अधिक असल्यास दोन ते तीन तासांनी बदलावेत. वापरणे, बदलणे यासाठी सोपा प्रकार असला तरीही दरमहा होणारा खर्च आणि मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा प्लास्टिक कचरा हे याचे तोटे आहेत. वापरलेल्या पॅड्सची नीट विल्हेवाट न लावल्यास परिसरात आरोग्य समस्या उद्वण्याचा धोका असतो.

### टॅम्पून्स

टॅम्पून्स म्हणजे एक प्रकारे कापसाचा गोळा. योनीच्या आतल्या बाजूस घालून हे वापरात येतात. हे एकदाच वापरता येण्यासारखे असून रक्तस्त्रावानुसार दर दोन ते तीन तासांनी बदलणे आवश्यक आहे. आठ तासांहून अधिक काळ एक टॅम्पून वापरू नये. अधिक काळ योनीमार्गात राहिल्यास इथली जागा अतिकोरडी किंवा जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. यातून इतर तक्रारी उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे याचा वापर करीत असताना योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच बदलल्यानंतर हातांची स्वच्छता राखणे गरजेचे आहे. या प्रकाराचा प्रमुख फायदा म्हणजे हालचालींना अडथळा येत नाही व मुक्तपणे वावरता येते. नॅपकिन किंवा कापडी पॅडच्या तुलनेत टॅम्पून्स महाग असल्याने सर्वांनाच हा पर्याय परवडणारा नाही.

### मेनस्ट्रअल कप

अधिक प्रचलित नसलेला पण आरोग्यदृष्ट्या फायदेशीर आणि पर्यावरणपूरक साधनप्रकार आहे. यात एकदाच आणि पुनर्वापर करता येणारे असे दोन्ही प्रकार आहेत. योनीच्या आत ठेवण्यात येणाऱ्या या कपमध्ये रक्तस्त्राव शोषला जात नाही तर साठवला जातो. काही कालावधीनंतर हा कप काढून त्यात साठलेला स्त्रावची शौचालयात विल्हेवाट लावली जाते. बारा तासांपर्यंत न बदलता या कपचा वापर करणे शक्य आहे. एक कप अनेक वर्षे वापरता येत असल्याने आर्थिकदृष्ट्या परवडते, तसेच विघटन न होणारा जैविक कचराही यातून निर्माण होत नाही. सुरुवातीला कप नीट बसवणे जिकिरीचे होऊ शकते. म्हणूनच मग बऱ्याचदा विवाहित महिलांनाच हा पर्याय वापरण्याचा सल्ला दिला जातो. पुनर्वापर होणारा कप असेल तर नियमित स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. कप काढताना नीट काळजी घेणे अत्यावश्यक आहे. योग्य खबरदारी घेऊन याचा वापर केल्यास हा सोयीस्कर पर्याय ठरू शकतो.

### मासिक पाळीत घ्यावयाची काळजी

- वारंवार कापड/ पॅड बदलणे : एकदा रक्त शरीरावाटे बाहेर पडले की ते जंतूंच्या वाढीसाठी अनुकूल माध्यम बनते. म्हणून स्त्राव कमी असला तरी जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून वारंवार साधने बदलणे आवश्यक असते. तसेच हे बदलल्यावर हात आणि योनीची जागा स्वच्छ करणे आणि वापरलेल्या साधनांची योग्य विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. पुनर्वापर करता येणाऱ्या साधनांची स्वच्छता कापड किंवा अन्य पुनर्वापराच्या साधनांचा वापर करीत असल्यास ही साधने स्वच्छ धुणे आवश्यक आहे. जंतुविरहित राहण्यासाठी जंतुनाशकाचा वापर न करता कडक उन्हात वाळवावीत.
- साधनांची विल्हेवाट : एकदाच वापरण्याचे साधन असेल तर ते वापरून झाल्यानंतर योग्य पद्धतीने त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यावरील रक्तस्त्रावामुळे ते जंतुसंसर्ग पसरण्याची शक्यता असते. सॅटनरी नॅपकिन वापरानंतर पेपरमध्ये गुंडाळून कचऱ्यात टाकावेत. कचरा नेणाऱ्या घंटा गाडीत कधी कधी नॅपकिनसाठी वेगळा कप्पा असतो. अशा वेळी पॅड्स त्यातच टाकावेत. पॅड्स ओल्या कचऱ्यात टाकू नयेत, शौचालयामध्ये फ्लश करू नयेत, उघड्यावर फेकू नयेत.
- चट्टे येणे : एकच पॅड अधिक काळ वापरल्यास ओले होऊन मांड्यांना घासले जाते आणि मांड्यांवर चट्टे येतात. हे टाळण्यासाठी पॅड वारंवार बदलावेत आणि ती जागा कोरडी राहील याची काळजी घ्यावी. चट्टे आल्यास त्या जागी जंतुप्रतिबंधक पावडर किंवा मलमचा वापर करावा.

## शॉर्ट न्यूज

### चोरट्याने लॅपटॉपसह रक्कम लांबविली

■ **संगमनेर :** येथील सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना अमृतनगर येथून बंद घराचा कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने लॅपटॉप आणि दहा हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली. खासगी नोकरी करणारे बाळासाहेब विठोबा दातखिळे यांच्या अमृतनगरमधील बंद घराचा कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्याने कपाटात ठेवलेला लॅपटॉप आणि दहा हजार रुपये रोख रक्कम असा एकूण वीस हजार रुपये किमतीचा ऐवज लांबवला आहे. याप्रकरणी बाळासाहेव दातखिळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### वने यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

■ **राहुरी :** तालुक्यातील ब्राम्हणी येथील गोविंद चांगदेव वने यांनी नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत यश मिळवत पोलीस उप निरीक्षक पदाला गवसणी घातली. या यशाबद्दल त्यांचा व त्यांच्या वडिलांचा क्रांती सेनेकडून सत्कार करण्यात आला. सर्व सामान्य कुटुंबातील गोविंद वने यांनी तिसऱ्या प्रयत्नात पोलीस उप निरीक्षक पद मिळवले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मुख्य परिक्षा २०२२ मध्ये दिली होती. त्यात यश मिळाले. वडील चांगदेव व आई यमुना नानी यांनी गोविंद वने यांना वेळोवेळी मार्गदर्शन व साथ दिली.

### कांद्याच्या भावासह आवक वाढली

■ **नेवासा :** बाजार समितीच्या घोडेगाव उपबाजारात ६४४४३ कांदा गोण्यांची आवक होवून शेतकऱ्यांना ३ हजार रुपये क्किंटलचा भाव मिळाला आहे. मागील आठवड्यात अडीच हजाराच्या दरम्यान असलेला भाव शनिवारी ३ हजार झाल्याने लिलावात २० हजार गोण्यांची आवक वाढली आहे. एक नंबर कांद्यास ३ हजाराचा मिळाला तर मध्यम कांद्यास २५०० ते २८०० रुपयाचा भाव मिळाला. गोल्टी कांद्यास १३०० रुपये ते २००० तर जोड कांद्यास ५०० रुपये ते १५०० भाव मिळाला. काही मोजक्या कांदा गोण्यास ३३०० रुपये क्किंटलचा भाव मिळाला.

### मराठा आरक्षणाच्या उपोषणाला पाठिंबा

■ **मक्तापुर :** मराठा आरक्षणसाठी मनोज जरांगे यांच्या उपोषणाला मक्तापूर ग्रामस्थ व मराठा सुकाना समितीच्या वतीने ग्रामपंचायत समोर गणेश झगरे यांनी उपोषणाला पाठिंबा दिला आहे. गणेश झगरे म्हणाले की केंद्र सरकारने व महाराष्ट्र सरकारने जरांगे पाटील यांच्या मागणी प्रमाणे सागेसोयरे याच्यातून मराठा आरक्षण समाजाला मिळावा. मराठ्यांना जर आरक्षण दिल नाहीतर विधानसभा निवडणुकीत मराठा समाज भाजप व शिंदे गटाला धडा शिकल्याशिवाय राहणार नाही असे झगरे यांनी सांगितले. यावेळी मक्तापूर ग्रामस्थांनी झगरे यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला.

### नगर मनमाड महामार्गावर अपघात

■ **नगर :** नगर-मनमाड महमार्गावर मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास पंजाब येथील ट्रक चालक बलविंदरसिंग मागेल सिंग हा आपल्या ताब्यातील ट्रक चालवत असताना त्यास अचानक फिट येऊन तोंडातून फेस निघू लागल्यावर क्लीनर सनी सोनू चंडाल याने वेळीच सावधानता दाखवत सदर ट्रक ताब्यात घेऊन वेळीच रस्त्याच्या एका बाजूस लावल्याने राज्य मार्गावर मोठा अपघात टळला. क्लीनर सनी सोनू चंडाल याने रस्त्याच्या कडेला गाडी उभी करून चालकास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले. क्लीनरने त्यानंतर सदर घटना पोलिसांच्या निदर्शनास आणली आहे.



■ नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून खा.नीलेश लंके यांनी विजय संपादन केल्याबद्दल प्रसिद्ध उद्योजक संजय गारूडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ३०० रुपयांचे दागिने विकले तब्बल ६ कोटींना!

■ परदेशी महिलेची फसवणूक ■ दागिने बनावट असल्याचे सिद्ध

**जयपूर : वृत्तसंस्था**

**भारतात अनेक विदेशी पर्यटक फिरण्यासाठी येत असतात. हे पर्यटक स्थानिक बाजार व मार्केटमधून त्यांना आवडलेल्या वस्तू खरेदी करत असतात. यामधून आपल्या देशाच्या रोजगार वाढीसाठी चालना मिळत असते. परंतु परदेशी पाहुण्यांची भारतात फसवणूक होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. विदेशी पर्यटकांच्या अज्ञानाचा किंवा ते परत येणार नाहीत या गोष्टीचा फायदा घेऊन त्याची फसवणूक केल्याचे प्रकार समोर येत आहेत. असाच एक धक्कादायक प्रकार जयपूरच्या जोहरी बाजारातून समोर आला आहे. अमेरिकेतील चेरीश यांना ३०० रुपयांचे दागिने तब्बल ६ कोटींना विकले आहेत. याप्रकरणी दुकान मालकाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.**



अमेरिकेत राहणाऱ्या चेरीश ही पर्यटनासाठी आली असताना जयपूरच्या जोहरी बाजारातून दागिने खरेदी केले होते. या दागिन्यांची किंमत ६ कोटी रुपये सांगण्यात आली. चेरीश यांनी हा दागिना विकत घेतला आणि अमेरिकेतील एका प्रदर्शनात विक्रीसाठी ठेवला. परंतु, या प्रदर्शनात हा दागिना बनावट असल्याचं सिद्ध झालं. त्यामुळे चेरिशला ग्राहकांच्या रोषाचा सामना करावा लागला.

सहा कोटींचा हा व्यवहार असल्याने अमेरिकेहून चेरीश पुन्हा भारतात परतली आणि तिने जिथून दागिना विकत घेतला होता त्या दुकानात गेली. परंतु, महिलेच्या तक्रारीकडे दुकानदारांनी दुर्लक्ष केलं. या दुकानाचे मालक राजेंद्र सोनी आणि त्यांचा मुलगा गौरव सोनी यांनी दागिना बनावट असल्याचा दावा फेटाळून लावला. त्यामुळे संतापलेल्या चेरीशने मानक चौक पोलीस ठाण्यात दुकानमालकाविरोधात तक्रार दाखल केली. परंतु, दुकान मालकाने तिच्याचविरोधात खोटा गुन्हा दाखल केला.

या संपूर्ण प्रकरात चेरीश ही ६ कोटी परत कसे मिळवायचे या विवंचनेत होती. त्यामुळे तिने तत्काळ अमेरिकेच्या दुतावासाशी संपर्क साधला. अमेरिकेच्या दुतावासांनी थेट जयपूर पोलिसांकडे याबाबत विचारणा केल्यावर याप्रकरणाचा तपास वेगाने सुरू झाला. त्यामुळे हे दागिने खरोखर बनावट असल्याचं आढळून आलं. दरम्यान, दुकानाचे मालक राजेंद्र सोनी आणि त्यांचा मुलगा गौरव सोनी सध्या फरार आहे. तर दागिन्यांसाठी बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या नंद किशोरला अटक करण्यात आली आहे. आरोपीला पकडण्यासाठी जयपूर पोलिसांचं विशेष पथक तयार करण्यात आलं आहे.

जयपूर पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात दुकानमालकांनी नुकतीच तीन कोटी रुपयांची अपार्टमेंट खरेदी केल्याचे समोर आले आहे. तसेच आरोपींनी ३०० रुपये किमतीचे सोन्याचे पॉलिश असलेले दागिने परदेशी महिलेला ६ कोटी रुपयांना विकले आणि तिला सत्यतेचे बनावट प्रमाणपत्र दिल्याचे समोर येत आहे. बनावट प्रमाणपत्र जारी करणाऱ्या नंद किशोरला अटक करण्यात आली असून, फरार पिता-पुत्राचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.


# विवेक कोल्हेंच्या संस्थांवर शासकीय विभागांच्या धाडी

विविध पथके चौकशीसाठी कोपरगावात दाखल

**कोपरगाव: प्रतिनिधी**

**नाशिक शिक्षक मतदारसंघात अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या विवेक कोल्हे यांच्याशी संबंधित संस्थांवर विविध शासकीय विभागांच्या धाडी पडल्याची माहिती असून ३ जून पासून आत्तपर्यंत तीन वेळा शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क, शिक्षण विभाग यासह विविध प्रकारचे धाडसत्र सुरू आहे. विविध शासकीय पथके कोपरगावात येऊन कोल्हे यांच्याबाबत चौकशी करत असल्याने जनसामान्यांत चर्चा सुरू झाली आहे. विवेक कोल्हे यांनी नाशिक शिक्षक मतदार संघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी हे दबावतंत्र तर सुरू नाही ना? अशी चर्चाही दबक्या आवाजात सुरू आहे.**

कोपरगाव येथील सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्यावर विविध शासकिय विभागांच्या पथकांनी छापे मारले



आहेत. अधिकारी विविध कागदपत्रे तपासणी असून संस्थेच्या अधिकाऱ्यांची देखील पथकाकडून चौकशी सुरू आहे. संजीवनी शिक्षण संस्थेची देखील कागदपत्र तपासणी शिक्षण विभागाचे पथक करीत असल्याची माहिती असून गेल्या १४ तासांपासून कारखान्यातील व शिक्षण संस्थेतील विविध अधिकाऱ्यांची चौकशी होत असल्याची सूत्रांची माहिती आहे. अनेक वेळा कारवाईसाठी दाखल झालेल्या शासनाच्या विविध पथकांकडून अत्यंत गोपनीयता पाळली जात आहे. सध्या तरी काहीही अनियमितता आढळली नसल्याची माहिती असून पुढे काय माहिती समोर येते याकडे अनेकांच्या नजरा लागल्या आहे.

शिक्षक मतदारसंघातून विवेक कोल्हे यांनी अपक्ष उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर होत असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. विवेक कोल्हे हे कोपरगाव येथील सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आहे. तसेच संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचे विश्वस्त आहे. शासनाच्या विविध विभागांकडून कोल्हे यांच्या संस्थांवर धाडी छत्रपती संभाजीनगर , पुणे , सोलापूर येथील पथकाने आत्तापर्यंत चौकशी केल्याची माहिती असून ३ जूनपासून आजपर्यंत तिसऱ्यांदा चौकशी होत असून अद्याप काही गैर प्रकार आढळले नसल्याची प्राथमिक माहिती आहे. शासनाचे अधिकारी प्रसारमाध्यमांसमोर कधी माहिती देणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शासनाच्या विविध अधिकाऱ्यांनी धाड टाकली. मात्र स्थानिक पोलिसांना याची कोणतीही माहिती संबंधित पथकाने दिलेली नाही.

# नगर मधील विजेचा लपंडाव थांबवावा

**नगर : प्रतिनिधी**

**शहरात गेल्या महिन्यापासून विजेचे भारनियमन चालू असून सध्या पाऊस सुरू झाल्यापासून नगर शहरात दिवस रात्र विजेचा लपंडाव चालू असतो तो त्वरित थांबवा असे निवेदन भारतीय जनता युवा मोर्चाचे वतीने आज स्टेशन रोडवरील महावितरण कार्यालयात कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब कुमावत यांना देण्यात आले.** यावेळी युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष मयूर बोचुघोळ , उपाध्यक्ष अजित कोतकर,विशाल शितोळे,आदेश गायकवाड,अमोल थोरात,श्रेयस नरालआदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते रात्री अपरात्री विजेचा पुरवठा



खंडित होऊन वीजपुरवठा लवकर सुरळीत होत नाही नगर शहरात महावितरण ला फोन लावला असता फोन उचलला जात नाही, यामुळे नगर शहरातील नागरिकांचे अतोनात मानसिक त्रास सहन करावा लागतो,तरी यावर लवकर उपायोजना करून नागरिकांना त्रास मुक्त करावे. जर आपण यावर कार्यवाही केली नाही तर भारतीय जनता युवा मोर्चा आपल्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करेल असे मयूर बोचुघोळ म्हणाले.

(पान १ वरून)

## अजितदादांच्या भेटीला शिवाजी कर्डिले!

तेथून जोर लावण्याच्या प्रयत्न आहेत. मात्र, लोकसभा निवडणुकीत श्रीगोंद्यात महाविकास आघाडीला मताधिक्य मिळाले आहे. तर राहुरीत महायुतीला मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे कर्डीले यांचे प्राधान्य राहुरीला असू शकते. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे डॉ. सुजय विखे पाटील यांचा पराभव झाला. मात्र, राहुरीत त्यांना मताधिक्य मिळाले आहे. पराभवानंतर एका कार्यक्रमात बोलताना विखे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत आपण कर्डीले यांना विजयी करण्यासाठी जीवाचे रान करू, असे सांगितले आहे. अजितदादांचा पक्ष महायुतीमध्ये आहे. त्यांच्याकडून ८० जागा मागितल्या जात आहेत. मुख्य म्हणजे जेथे राष्ट्रवादीचे आमदार आहेत, त्या जागांवर अजितदादा दावा करू शकतात. त्यामुळे राहुरीची जागा त्यांच्याकडे जाण्याची शक्यता आहे. शिवाय श्रीगोंद्यातही अजित पवार गटाने विस्तार केला आहे. त्यामुळे गरज पडल्यास अजितदादांच्या पक्षाकडून निवडणूक लढविता यावी, यासाठी कर्डीले यांनी आतापासूनच तयारी सुरू केली असल्याचे सांगण्यात येते. श्रीगोंद्याची जागा मिळविण्यासाठी तेथील इच्छुकांची संख्या लक्षात घेता कर्डीले यांना जड जाणार आहे. राहुरीत मात्र फारशी अडचण येण्याची शक्यता नाही. याशिवाय कर्डीले यांनी त्यांचे पुत्र अक्षय यांनाही आता राजकारणात पुढे आणले आहे. विधानसभेसाठी सोय म्हणून कर्डीले यांना अजितदादांच्या पक्षात जावे लागले तर अजितदादांच्या गटाला नगरमध्ये मोठा नेता मिळणार आहे. कर्डीले यांचे जावई नगर शहराचे आमदार संग्राम जगताप अजितदादांच्या गटात आधीच गेलेले आहेत. कर्डीले आणि जगताप यांच्या माध्यमातून अजितदादा गटाला जिल्ह्यात आणखी फायदा होऊ शकतो. दुसरीकडे नगर जिल्ह्यात ज्येष्ठ नेते शरद पवार आता आणखी ताकदीनिशी उतरणार आहेत. अशा परिस्थितीत भाजप आणि अजितदादा गटालाही मोर्चेबांधणी करणे भाग असल्याने येत्या काही काळात अशा राजकीय हालचाली वेगाने होताना पहायला मिळणार आहेत.









# वडनेरकरांची विकास कामांना पसंती!

## नीलेश लंके यांना मोठी आघाडी

वडनेर बुद्रुक : प्रतिनिधी

**खा. डॉ. नीलेश लंके यांनी त्यांच्या आमदारकीच्या कालखंडात वडनेर बुद्रुकला कोटयावधींचा निधी दिल्याने वडनेकरांनी विकास कामांना साथ देत लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना भरभरून मते दिली. लंके यांना १ हजार ३६७ तर विरोधी डॉ. सुजय विखे यांना ४३५ मते मिळाली. वडनेर बुदुकच्या मतदारांनी भरभरून मते दिल्याबददल खा. डॉ. नीलेश लंके यांनी मतदारांचे आभार मानले आहेत.**



खा. नीलेश लंके यांनी त्यांच्या आमदारकीच्या काळामध्ये गेल्या साडेचार वर्षात बो-हाडे मळा हिरामाता मंदीर रस्त्यासाठी १० लाख, येवले मळा वाकान रस्त्यासाठी ८० लाख, टेंभी मळा रस्त्यासाठी ३० लाख, दलित वस्ती सुधारणा अंतर्गत गावातील सिमेंट कॉंक्रीट रस्त्यासाठी १० लाख, खार ओढा येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधणे १ कोटी ६२ लाख, गारनाथ खार ओढा येथे कोल्हापुर पध्दतीचा बंधारा १ कोटी ६५ लाख या कामांसाठी निधी दिला.

खा. नीलेश लंके यांना वडनेर बुद्रुक येथील यादी भाग क्र. २४३ वाजेवाडी येथे २२९, यादी भाग क्र. २४४ वडनेर बुद्रुक ४०३, यादी भाग क्र. २४५ वडनेर बुद्रुक ३४६, यादी भाग क्र. २४८ बाबर मळा ३६९ अशी एकूण १ हजार ३६७ मते मिळाली तर भाजपाचे डॉ. सुजय विखे यांना ४३५ मते मिळाली. लंके यांना वडनेर बुद्रुक येथे ९३२ मतांची घसघशीत आघाडी मिळाली. लंके यांच्या चिन्हासदृश असलेल्या पिपानी चिन्ह असलेल्या उमेदवाराला ६७ मते मिळाली.

# सुदाम आंधळे मंत्रालयातील सहकार विभागाच्या उपसचिवपदी

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**मंत्रालयातील आदर्श व कार्यक्षम अधिकारी पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या गावचे सुपुत्र सुदाम एकनाथ आंधळे यांची महाराष्ट्र शासनाच्या सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग मंत्रालय, मुंबई येथे उपसचिव या पदावर पदोन्नती झाली आहे.**

कर्जुले हर्या येथे सर्वसामान्य कुटुंबात जन्म झाल्यानंतर शिक्षण घेऊन एमपीएससी च्या माध्यमातून त्यांची १९९२ साली मंत्रालयामध्ये सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून निवड झाली मंत्रालयामध्ये काम करत असताना ते एक कार्यक्षम प्रामाणिक अधिकारी म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी आदिवासी विकास विभाग ग्राम विकास विभाग या मंत्रालयातील विभागांमध्ये कक्ष अधिकारी तसेच सामान्य प्रशासन विभाग कृषी पशुसंवर्धन विभाग या विभागामध्ये अवर सचिव म्हणून काम केले आहे. एक प्रामाणिक अधिकारी म्हणून त्यांना मंत्रालयात ओळखले जाते.



मंत्रालयामध्ये काम करत असताना त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांची नुकतीच सहकार वस्त्रोद्योग व पणन विभाग मंत्रालय येथे उपसचिव पदावर पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या निवडीचे मित्रपरिवार नातेवाईक व कर्जुले हर्या ग्रामस्थ यांनी कौतुक करत अभिनंदन केले आहे. सुदाम आंधळे यांनी कामातून मिळवलेले हे यश आजच्या नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहे. एमपीएससी च्या माध्यमातून निवड झाल्यानंतर मंत्रालयातील उपसचिव पदापर्यंत त्यांनी मारलेली मजल ही खऱ्या अर्थाने प्रेरणादायीच आहे.

# पारनेर तालुक्यात मुसळधार पावसाची हजेरी

## रस्त्यांची दुरवस्था, हंगा नदीला पूर

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यात एक दिवस विश्रांतीनंतर आज मंगळवार दि. ११ रोजी पावसाने जोरदार हजेरी लावली. ढगफुटी सदृष्य पावसाने ओढे नाले ओसंडून वाहू लागले. तर शेतकऱ्यांच्या शेतात मुगार पडल्याने माती वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले.**

चालू वर्षी उन्हाळ्यात प्रचंड उष्णता जाणवत होती, उन्हाचा पारा ४३ अंश सेल्सिअस वर चढल्याने नागरिकांना प्रचंड उष्णतेचा सामना करावा लागला. मे महिन्यात २४ तारखेला लागलेले नक्षत्र कोरडे गेल्यानंतर जुन महिन्यात शनिवार दि.८ व रविवार दि. ९ तारखेला पावसाचे आगमन झाले. सोमवारी एका दिवसाच्या विश्रांतीनंतर मंगळवार दि. ११ रोजी पुन्हा सकाळी ढग दाटून आले होते. वातावरणात प्रचंड उष्णता जाणवत होती दुपारी चार नंतर अचानक जोरदार पावसाला सुरुवात झाली. या पावसाने पारनेर शहरात अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने अनेकांनी नगरपंचायतीच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

सुपा शहरात मुसळधार पाऊस झाल्याने संपूर्ण शहर जलमय झाले. बाजारतळ व सुपा बसस्थानकात पाणी आल्याने तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. नगर - पुणे महामार्गावर चालकांना गाड्या काढतांना मोठी कसरत करावी लागली. तर वाळवणे रस्त्यावर पुल झाल्यानंतर प्रथमच जोरदार पाऊस झाल्याने वाहतुकीला अडथळा न होता नागरिकांना ये - जा करता आल्याने समाधान व्यक्त केले. तालुक्यात ढगफुटी सदृष्य पावसाने हंगा नदीला गेली चार ते पाच वर्षांत प्रथमच मोठ्या प्रमाणात पाणी आले. तर मुसळधार पावसामुळे रस्त्यावर पाणी साठल्याने रस्त्याची दुरवस्था झाली.

दरम्यान चालू वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यातच पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. पेरणीपूर्व मशागती शेतकऱ्यांनी पुर्ण केल्या असून महागडे बी बियाणे खरेदी केली आहेत. वापसा होताच खरीप हंगामातील मुग, बाजरी, वाटाणा, तुर, जनावरांसाठी मका, कडवळ, घास आदींची पेरणी व सोगणी करण्यात येणार आहे. तर पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न सुटणार असल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.




रूईछत्रपती ता. पारनेर येथील हंगा नदी मंगळवारी सायंकाळी झालेल्या पावसाने दुथडी भरून वाहू लागली. (छाया - शरद रसाळ, सुपा)

### पाऊस आला विजेचा खेळखंडोबा

**शनिवार पासून पावसाचे आगमन झाले असून सुपा परीसरातील महावितरणचा गलथान कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. पाऊस सुरू होताच महावितरण कडून विद्यूत पुरवठा बंद केला जातो. यात नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. वीजपुरवठा खंडित झाला असता विविध कंपन्यांचे टॉवर देखील बंद होतात. पर्यायी गावच रेंजच्या बाहेर असल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणीचा सामना करावा लागला.**

# मळगंगा ट्रस्टला मळगंगा मंडळाची सव्वा लाखाची देणगी

## सत्ताधारी मंडळाच्या निर्णयाचे स्वागत

निघोज : प्रतिनिधी

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निवडणूकीचा खर्च १ लाख २२ हजार झाला असून हा खर्च भरुन काढण्यासाठी ट्रस्टला सत्ताधारी मळगंगा मंडळाने मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला सव्वा लाखाची देणगी दिली असून या कौतुकास्पद निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

अध्यक्ष शांताराम लंके, उपाध्यक्ष वसंत कवाद , कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वास शेटे, संघटक रामदास वरखडे, विश्वस्त ठकाराम लंके, अनिल लंके ,विठ्ठल कवाद ,संतोष रसाळ शंकरराव लामखडे , रामदास लामखडे , रामदास ससाणे , लक्ष्मण ढवळे , रोहिदास लामखडे , ज्ञानेश्वर लंके , अशोक वरखडे , मंगेश वराळ , मोहिनी वरखडे, सिमा वराळ आदी उमेदवार मळगंगा मंडळाचे निवडून आले आहेत तसेच विरोधी मंडळाचे शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे हे एकमेव निवडून आले आहेत.

निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वच नेतेमंडळींनी प्रयत्न केले असले तरी काही उत्साही युवकांनी उमेदवारी अर्ज काढून न घेता निवडणूकीला सर्वांनाच सामोरे जावे लागले. मात्र यामुळे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला निवडणूकीचा भुर्दंड बसणार असल्याची चर्चा होत होती लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळत आहे. त्यातूनच विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मग निवडणूक नको तर बिनविरोध करा तेवढेच ट्रस्टला भुर्दंड




आर्थिक पडणार नाही अशी सभासदांची प्रामाणिक भावना होती. याच भावनेला प्रतिसाद देत मंगळवार दि. ११ रोजी मळगंगा मंडळाची बैठकीत पदाधिकारी निवडीसाठी बैठक संपन्न झाली व यामध्ये सर्व मळगंगा मंडळाच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत हा निवडणूकीचा खर्च भरुन काढण्यासाठी ट्रस्टला सव्वा लाख रुपये देणगी देण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयाबद्दल सभासद, देणगीदार, राज्यातील भाविक यांनी समाधान व्यक्त केले असून सत्ताधारी मळगंगा मंडळाने अशाप्रकारे चांगला निर्णय घेऊन सभासदांच्या शब्दाला एकप्रकारे मान देऊन देणगीच्या माध्यमातून सन्मान केला असून अशाप्रकारे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने आर्थिक प्रगती साधित परिसराच्या विकासासाठी गती देण्याचे काम करावे अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे खासदार म्हणून नीलेश लंके यांची निवड झाली व त्यांच्याच विचाराचे विश्वस्त मंडळ या ठिकाणी निवडून आले हा मळगंगा देवीचा आशीर्वाद असून हा दैवी योग आहे.

खासदार लंके यांनी गेली साडेचार वर्षात आमदारकीच्या कार्यकाळात ७८ कोटींची विकासकामे देऊन फार मोठ्या प्रमाणात निघोज आणी परिसराच्या विकासासाठी चालना दिली आहे. विधानसभा सदस्य म्हणून निवडणूकीत सर्वाधिक मताधिक्य देण्याचे काम निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटाने केले असून लोकसभा निवडणुकीत सुद्धा या गटाने दक्षिण लोकसभा मतदारसंघात या गटाने एक नंबरचे मताधिक्य लंके यांना दिले असून खासदार म्हणून जनतेचे मोठे योगदान आहे. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीवर खासदार लंके यांची अपार श्रद्धा असून लंके हे लोकसभा निवडणुकीत व्यस्त असताना सुद्धा दि.२ मे रोजी देवीच्या यात्रेसाठी देणगी पावत्या व देवीच्या सेवेसाठी त्यांनी दोन तास दिले. विकासकामे देताना जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंडमाऊली मळगंगा देवी परिसराच्या विकासासाठी पाच कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये निघोज - खंडोबा पाउतके सिमेंट कॉंक्रटीकरण ७२० मीटर रस्ता काम पूर्ण झाले असून उर्वरित कुंडावरील पर्यटकांसाठी निवास व्यवस्था व भोजनकक्ष हे आठ हजार स्क्वेअर फूट काम लवकरच सुरू होणार असून खासदार म्हणून निघोज आणि परिसरातील जनतेसाठी लंके सर्वाधिक निधी मिळवून देतील अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

# अळकुटी गणातून अनिल आवारी इच्छुक

## आवारी खा.लंके समर्थक

रांधे : प्रतिनिधी

**अळकुटी पंचायत समिती गणामधून राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून खा. नीलेश लंके यांचे खंदे समर्थक अनिल आवारी हे निवडणूक लढविण्यासाठी उत्सुक आहेत.**



अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत जिल्हा परीषदेच्या निघोज गटात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार नीलेश लंके यांना मोठी आघाडी मिळाली. निघोज जिल्हा परीषदेच्या अळकुटी गणात लंके यांना ५ हजार ९७८ मतांची मोठी आघाडी मिळाली. या आघाडीमुळे आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीसाठी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या असून अनेक इच्छुकांनी चाचपणी करण्यास सुरूवात केली आहे. रांधे येथील पूर्वाश्रमीचे शिवसैनिक व लंके यांचे निष्ठावान कार्यकर्ते, रांधूबाई देवस्थानचे उपाध्यक्ष, उद्योजक अनिल आवारी यांनीही निवडणूक लढवावी अशी कार्यकर्त्यांची भावना असून स्वतः आवारी हे देखिल ही निवडणूक लढविण्यास उत्सुक आहेत.

पंचायत समितीच्या अळकुटी गणात आवारी यांचा मोठा जनसंपर्क असून मित्रपरीवार तसेच सगे सोयऱ्यांच्या बळावर ही निवडणूक आपणास सोपी जाईल असा विश्वास आवारी यांनी व्यक्त केला. या गणामध्ये रांधे, दरोडी, गारखिंडी, कळस, पाडळीआळे, अळकुटी, शेरी कासारे, लोणीमावळा, पाबळ, म्हस्केवाडी, रेनवडी, चोंभूत, शिरापूर या गावांचा समावेश होतो. या ११ गावांमधून नीलेश लंके यांना १० हजार ३६४ तर विरोधी मा. खा. डॉ. सुजय विखे यांना ४ हजार ३८६मते मिळाली आहेत.

अळकुटी जिल्हा परीषद गटामध्ये महाविकास आघाडीच्या वतीने शिवसेना नेते, पंचायत समितीचे मा. सदस्य डॉ. भास्करराव शिरोळे यांची उमेदवारी निश्चित मानली जात असून अळकुटी व निघोज पंचायत समिती गणांमध्ये मात्र उमेदवारीसाठी मोठी चुरस पहावयास मिळत आहे.

# कोमल कोळसे यांना अभिनेते अंकुश चौधरी यांच्या हस्ते गौरव

राहुरी : प्रतिनिधी

**राहुरी फॅक्टरी येथील तन्वी ब्युटी स्टुडिओच्या संचालिका कोमल कोळसे यांना नाशिक येथे डीएसार कंपनीच्याच्यावतीने उत्कृष्ट ब्युटीशीयन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.**



कोमल कोळसे यांनी राहुरी फॅक्टरी परिसरात ब्युटी स्टुडिओच्या माध्यमातून उत्कृष्ट काम करून चांगला नावलौकिक कमविला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन नाशिक येथील कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात मराठी चित्रपट अभिनेते अंकुश चौधरी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी डीएसार कंपनीचे अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्यने महिला उपस्थित होत्या.

# महेश कांबळे यांना वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड प्रदान

## पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ठ कामाचा सन्मान




नगर: प्रतिनिधी

**येथील पत्रकार व प्रेस फोटोग्राफर महेश कांबळे याना वर्ल्ड कॉन्स्टीट्यूशन अँड पार्लमेंट असोशिएशन(डब्ल्यूसीपीए) अर्थात जागतिक संविधान व संसद संघाच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ठ काम केल्याबद्दल वर्ल्ड पार्लमेंटचा सर्वोच्च पुरस्कार''वर्ल्ड पार्लमेंट इंटरनॅशनल अवॉर्ड २०२४'' देऊन सन्मानीत करण्यात आले.**

श्रीरामपूर येथील समारंभात त्यांना प्रदान करण्यात आला यावेळी महाराष्ट्र सरकारच्या संपादकीय मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश कुलथे,डब्ल्यूसीपीएच्या महाराष्ट्र चॅप्टरचे अध्यक्ष डॉ.दत्ता विघावे ,हमाल साहित्यिक आनंदा साळवे ,एसटी महामंडळाचे नवनाथ गवळी, संपादक स्वामीराज कुलथे, पत्रकार सुनिल पाटील, जेष्ठ कवी रज्जाक शेख, राष्ट्रपती पदक विजेत्या मोनिका शिंपी, जेष्ठ कवियत्री मंजुषाताई ढोकचौळे,डॉ.शैलेंद्र भणगे,सी.के भोसले यांच्यासह मोठ्या संख्नेने लोक उपस्थित होते.

महेश कांबळे हे गेली २५ वर्षे पत्रकारिता करत असून त्याना दा. प .आपटे पत्रकारिता पुरस्कार,पुणे महानगरपालिका,दै.सामना, दै लोकसत्ता,संकेत अकॅडमी,पुणे,यांचे पुरस्कार मिळालेले आहेत तसेच ते मनपाचे वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य असून जागतिक साळी फाऊंडेशन व बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख आहेत,प्रतिबिब संस्थेचे सचिव असून लक्ष्मीनारायण शाळेचे माजी सचिव आहेत त्यांनी काढलेले प्रेस फोटो व लेख मराठी,हिंदी,इंग्रजी दैनिकात प्रकाशित झालेले आहेत.त्यांनी आचार्य आनंदऋषी महानिर्वाणचे फोटो प्रदर्शन व फोटो क्लबच्या वतीने नगरमध्ये फोटो प्रदर्शन भरवलेले होते.

अवतार मेहेरबाबा व कोरठण खंडोबा या दोन माहिती पटाची त्यांनी निर्मिती केलेली आहे.पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याचे अनेकांनी अभिनंदन केले आहे

# संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गाचे काम वेळेत पूर्ण करा

## पालकमंत्री विखे पाटील यांच्या सूचना

नगर : प्रतिनिधी

**श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गाचे काम आषाढी वारीपूर्वी निर्धारीत वेळेत पूर्ण करा. हे काम करताना कामाची गुणवत्ता राखा, वारकर्यांसाठी तयार होत असल्याने या मार्गाच्या कामाबाबत अधिकार्यांनीही सतर्क राहून हे काम पूर्ण करा, अशा सूचना महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.**



आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी त्र्यंबकेश्वर येथून २० जून रोजी मार्गस्थ होणार आहे. २७ जून रोजी परंपरेप्रमाणे तालुक्यातील पारेगाव येथे या पालखीचा मुक्काम असणार आहे. यामार्गाचे काम अधिक दर्जेदार आणि गुणवत्तेने पूर्ण करावे. महायुती सरकारने या मार्गाला मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. एका आध्यात्मिक कार्यासाठी हा मार्ग होणार असल्याने या कामाचे वेगळेपणही दाखवून द्या, अशा सूचनाही मंत्री विखे पाटील यांनी अधिकार्यांना दिल्या आहेत.




'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com